N.C.R.B (एनसीआरबी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर शहर **P.S.(ठाणे):** वेदांत नगर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0095 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/05/2025 01:26

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 8 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 09/05/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 09/05/2025
**Time From (वेळेपासून):** 15:41 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:41 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 10/05/2025 **Time (वेळ):** 01:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/05/2025 01:15 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जीएम प्लाझा हॉटेल, आरटीओ कार्यालयाचे बाजुस,स्टेशन रोड छसंभाजीनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** चंद्रगणेश व्यंकटराव कडाली

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन क )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 202 पुष्प सरीता प्लट नंबर 6 ,सेक्टर 17 कामोठे ,नवी मुंबई -,बृहन्मुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 202 पुष्प सरीता प्लट नंबर 6 ,सेक्टर 17 कामोठे ,नवी मुंबई -,बृहन्मुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7021757437

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दिपक साहेबराव पवार | | | 1. गजानन नगर ,गारखेडा परिसर , छत्रपती संभाजीनगर,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | स्वीकारलेली रोख रक्कम | 50,000.0 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

50,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 10/05/2025

मी चंद्रगणेश व्यंकटराव कडाली वय 43 वर्ष राहणार 202 पुष्प सरीता प्लॉट नंबर 6 सेक्टर 17 कामोठे नवी मुंबई -410218 मो.7021757437

मी वर नमुद पत्यावर परिवारासह राहण्यास असुन माझ्या ट्रान्सपोर्टचा व्यवसायातुन येणा-या उत्पन्नावर माझा व परीवाराचा उदर निर्वाह "चालतो. मी दिनांक 08/05/2025 रोजी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर येथे हजर राहुन लाचमागणीची तक्रार दिली होती की, " माझा जीपीएस कार्गो नावाने 2014 पासुन ट्रान्सपोर्टचा व्यवसाय असुन विमा कॉम्प्लेक्स सेक्टर KWC कळंम्बोली या ठिकाणी ऑफीस आहे. आम्ही वेगवेगळ्या मशीनरी यांचे संपुर्ण भारतभर वाहतुक करुन एका ठिकाणाहुन दुस-या ठिकाणी पोहचवतो माझा उद्यम ओळखपत्र क्र.UDYAM NO-MH2700037362 असा आहे.माझ्या कडे 10 ट्रेलर असुन त्याचे माध्यमातुन मी व्यवसाय चालवीतो.1.NL01AG3914 2.NL01Q3824 3. NL01N9954 4.NL01K0377 5. NL01N2763 6.DD01P9764 7.RJ41GA1183 8.RJ41GA1191 9.NL01AE4036 10. NL01AB5540 हे ट्रक टेलर माझ्या ट्रान्सपोर्ट मार्फत वाहतुक करतात. मान एनर्जी वाळुज एम. आय. डी. सी. छ.संभाजीनगर या कंपनीत तयार होणारे डीझेल इंजिनचे छ.संभाजीनगर ते चेन्नई अशी वाहतुक दहा ट्रक ट्रेलर मार्फत करण्याची कंपनीचे अधिका-यांशी बोलने चालु आहे.

माझ्या दहा वाहनांची वाहतुक करण्याची क्षमता 36 टन एवढी असुन एका इंजिनचे वजन 45 टन आहे. त्यामुळे 9 टन वजन जास्त होत असल्याने आरटीओ विभाग गाडयांवर ओव्हरलोडची कारवाई करतात.माझ्या ट्रान्सपोर्ट मार्फत दहा ट्रक टेलरची संभाजीनगर ते चेन्नई या मार्गावर सुरळीत वाहतुक होण्यासाठी व ओव्हरलोडची वाहनांवर कारवाई न करण्यासाठी मी दिनांक 05/05/2025 रोजी 08.42 वा.7021757437 नंबर वरुन आरटीओचा पंटर दिपक पवार यांचा मोबाईल नंबर 9579581777 या क्रमांकावर फोन करुन माझ्या ट्रान्सपोर्ट मार्फत दहा ट्रक टेलरच्या ओहर लोड वाहतुक करणा-या गाडयांवर कारवाई न करण्यासाठी प्रत्येक गाडीस 5000 /- रुपये फक्त सभाजीनगर जिल्हा पुरते कारवाई न करण्यासाठी दयावे लागतील अशी म्हणुन प्रत्येक गाडीस 5000/- रुपये या प्रमाणे दहा गाडयासाठी 50,000 /- रुपयाची स्वत:साठी व त्याचे साहेबासाठी लाच मागणी केली आहे.

दिनांक 08/05/2025 रोजी छत्रपती संभाजीनगर येथे येवुन श्री दिपक पवार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी पोलीस अधिक्षक ,लाप्रवि छ.संभाजीनगर यांची समक्ष भेट घेवुन माझी तक्रार सांगीतली असता त्यांनी पोलीस उप अधिक्षक श्री साबळे यांना माझे तक्रारी वरुन कारवाई करण्यास सांगीतले.मी दिनांक 08/05/2025 रोजी इसम नामे श्री दिपक पवार, आरटीओ पंटर यांची भेट घेणार असुन त्याचे मागणी प्रमाणे प्रति वाहन 5000/- प्रमाणे दहा वाहनाचे 50,000 /- रुपये त्यांना लाच देण्याची इच्छा नाही त्याच्याशी या पुर्वी माझी कधीही भेट झालेली नाही. माझा त्यांच्याशी काही एक देण्या घेण्याचा उसन वारीचा व्यवहार नसुन त्यांच्याशी माझी कोणतीही दुश्मनी अथवा वैर नाही सबब त्यांनी लाच मागणी करुन स्विकारल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी "अशा स्वरुपाची वर नमुद प्रमाणे तक्रार दिली.

मी दिलेली लेखी तक्रार वाचल्यानंतर पोउपअ.श्री साबळे यांनी दोन पंचांना बोलावुन प्रथम लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यांनतर पंचाना व मला सदर पडताळणीमध्ये डीजीटल सोनी कं.चे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व मेमरी कार्ड वापरण्यात येणार असल्याचे सांगुन प्रात्यक्षीक पोह/जिवडे यांनी करुन दाखविले. त्यानंतर दिलेल्या सुचने वरुन माझ्या गळयात व्हाईस रेकॉर्डर चालु करुन त्यास अडकवुन पंच क्र.1 पुरी व माझा मित्र प्रशांत जाधव यासह कार क्र .MH46AR5749 मध्ये 19.00 वा.बसुन गजानन महाराज मंदिर जवळील रामभरोसे हॉटेल मध्ये आरटीओ एजंट श्री पवार यांची भेट घेतली. सदर भेटीत कामा विषयी चर्चा करुन 20:32 वा.सापळा पथक थांबलेल्या गोपनिय ठिकाणी परत आलो. पो.हवा/जिवडे यांनी माझ्या गळयातील व्हाईस रेकॉर्डर

काढुन बंद करुन पोउपअधि साबळे यांनी पंच क्र.1 पुरी यांचे कडे चौकशी केली असता त्यांनी सांगीतले की,
भेटीत तक्रारदार व एजंटश्री पवार यांचे मध्ये संभाषण झाले की " आरोपी यांनी तक्रारदार यांचे कडे एक गाडीचा
पाच हजार रुपये ,दस गाडी का पचास हजार रुपये होगा , असे सांगुन पन्नास हजार रुपयाची मागणी केली "
प्रकारे आरटीओ एजंट श्री पवार यांनी दहा गाडयाचे 50,000 रुपये लाचमागणी केल्याचे निष्पन्न झाले. तसा
सविस्तर लाचमागणी पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.
त्यानंतर दिनांक 9/05/2025 रोजी मला श्री पवार यांनी फोन करुन भेटण्यास बोलावल्याचे मी पोउप अ.श्री
दिलीप साबळे यांना कळविले.त्यानंतर मला पोउपअ. श्री दिलीप साबळे यांनी रेल्वेस्टेशन जवळील मोकळ्या
मैदानात बोलावले वरुन मी हजर झालो.सदर ठिकाणी पोउपअ श्री दिलीप साबळे याच्यासह सापळा पथक आणि
दोन पंच हजर होते. सदर ठिकाणी सर्वानुमते लाच स्विकृती सापळा आजमावण्याचे ठरले. त्यानतर पचाना व मला
सदर पडताळणीमध्ये डीजीटल सोनी कं.चे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व मेमरी कार्ड वापरण्यात येणार असल्याचे
सांगुन प्रात्यक्षीक पोह/चव्हाण यांनी करुन दाखविले. त्यानंतर मी माझ्या व्यवसायातील बचतीची सादर केलेली
50,000/- रुपये रक्कमेच्या नोटाना ॲन्थ्रॉसीन पावडर लावुन तीचे गुणधर्म समाजावुन माझ्या पॅन्टच्या उजव्या
खिशात ठेवुन एजंटपवार यांनी लाच स्विकारल्या नंतर मी आळस देईल असा इशारा करेल. त्यानंतर दिलेल्या
सुचने वरुन माझ्या गळयात व्हाईस रेकॉर्डर चालु करुन त्यास अडकवुन पंच क्र.1 पुरी व माझा मित्र प्रशांत जाधव
यासह क्र . MH46AR5749 या कार ने 14.35 वा. आरटीओ कार्यालया जवळ आरटीओ एजंट श्री पवार यांनी
भेट घेण्यास रवाना झालो.
आमचे पाठोपाठ पोउपअ श्री दिलीप साबळे,पोनि कोरे ,पोह/जोशी पोअ/चव्हाण आणि पंच क्र.2 असे पायी चालत
हॉटेलच्या आसपास विखरुन उभे राहीले.मी पंच क्र.1 पुरी यांचे सह आरटीओ एजंट श्री पवार यांची ठरल्या प्रमाणे
जीएम प्लाझा हॉटेल या मध्ये भेट घेवुन माझ्या कामा संदर्भात बोलणी करुन त्यांचे मागणी प्रमाणे माझ्या पॅन्टच्या
उजव्या खिशातुन काढुन एजंट श्री पवार यांचे हातात दिले. सदरची रक्कम श्री यांनी उजव्या हातात घेवुन
मोजण्यास सुरवात केली त्याच वेळी ठरल्या प्रमाणे मी 15.41 वा.नियोजीत आळस दिल्याचा इशारा करताच
आजुबाजुस दबा धरुन बसलेले सापळा पथकाचे अधिकारी व कर्मचारी हे तात्काळ त्या ठिकाणी आले.पोउपअधिक्षक
श्री साबळे यांनी श्री दिपक पवार यांचा एक हात मनगटा जवळ पकडुन त्यास त्यांनी ओळखपत्र दाखवुन स्वत:ची
ओळख करुन दिली त्यावेळी त्यांनी त्यांच्या हातातील लाच रक्कम शेजारील खुर्चीत टाकुन दिली पंच क्र.2 श्री
प्रितेश काळन यांना श्री साबळे सो यांचे आदेशा वरुन ती रक्कम ताब्यात घेतली सदर नोटांचे क्रमांकाची त्याना
पडताळणी करण्यास सांगीतली असता त्यांनी सदर नोटांचे नंबर नोंदवीलेला त्यांचे जवळ असलेला कागद काढुन
पडताळुन पाहीले असता त्याच क्रमांकाच्या नोटा असल्याचे सांगीतले. सदर वेळी त्यास त्याचे नाव विचारले असता
त्यांने त्यांचे नाव श्री दिपक साहेबराव पवार वय 45 वर्ष धंदा आरटीओ एजंटरा.गजानन नगर ,गारखेडा परिसर छ.
संभाजीनगर असे सांगितले.
त्यानंतर पंचा समक्ष त्याचे हातावर काळा कपडा लावुन अंधार करुन अल्ट्रा व्हॉयलेट टॉर्चचा प्रकाश टाकला असता
त्याचे हातावर,बोटावर,तळव्यावर आणि पॅन्टचे उजवे बाजुच्या वर वरील बाजुस हिरवट निळसर रंगाची चकाकी
दिसुन आली.सदर वेळी त्यानंतर सापळा पथकाने एजंट श्री पवार यांना ताब्यात घेवुन पुढील कार्यवाही कामी
लाप्रवि कार्यालयास आणले. सदर सापळा कारवाई दरम्यान व्हाईस रेकॉर्डर मधील झालेले संभाषण ऐकले
त्यामध्ये आरोपी हे तक्रारदार यांनी लाच रक्कम दिल्या नंतर " ये कितना है ? अशी विचारणा केली तक्रारदार यांनी
पचास है असे सांगीतले तेव्हां आरोपी यांनी " आपका जो भी है आपको सभालुंगा असे आश्वासन दिले " त्यानंतर
माझे सांगणेप्रमाणे व घडलेल्या घटनेप्रमाणे माझी फिर्याद तयार करण्यात आली असुन ती वरील प्रमाणे आहे.
तरी दि.08/05/2025 रोजी गजानन मंदिरा जवळील रामभरोसे हॉटेल मध्ये सभाजीनगर ते चैन्नई या मार्गावर
माझ्या ट्रान्सपोर्ट च्या वतीने चालणा-या दहा ट्रक ट्रेलरवर ओव्हरलोड कारवाई न करता सुरळीत वाहतुक होण्यासाठी
छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक परिवहन विभागाचे मोटार वाहन निरीक्षक यांचे वतीने आश्वारीत करुन आरटीओ
एजंट श्री दिपक साहेबराव पवार यांनी स्वत: करीता व मोटारवाहन निरीक्षक यांचे करीता 50,000रु.(पन्नास हजार
रुपये)ची लाचमागणी करुन दिनांक 09/05/2025 रोजी 15.41 वा.जीएम प्लाझा हॉटेल,आरटीओ कार्यालयाचे
बाजुस,स्टेशन रोड छ.संभाजीनगर या ठिकाणी पंचा समक्ष 50,000रु.(पन्नास हजार रुपये) लाचेची रक्कम स्वतः
स्विकारली आहे.सबब माझी आरटीओ एजंट श्री दिपक साहेबराव पवार यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझी वरील प्रमाणे फिर्याद संगणकावर मराठी भाषेत टंकलिखीत केली असुन ती मला माझा मित्र प्रशांत जाधव यांनी
मराठीत वाचुन व हिंदीतुन समजावुन सांगीतली असता माझे सांगणे प्रमाणे ती बरोबर आहे.
समक्ष ही फिर्याद दिली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
PRAVINA TARACHAND YADAV(I (Inspector)) / PI or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)
**Name** (नाव): PRAVINA TARACHA[illegible]
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

पो. नि. / डि. ओ. अधिकारी
वेदांत नगर पोलीस ठाणे
औरंगाबाद शहर

त्यानंतर पंचा समक्ष त्याचे हातावर काळा कपडा लावुन अंधार करुन अल्ट्रा व्हॉयलेट टॉर्चचा प्रकाश टाकला असता त्यांचे हातावर,बोटावर,तळव्यावर आणि पॅन्टचे उजवे बाजुच्या वर वरील बाजुस हिरवट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली.सदर वेळी त्यानंतर सापळा पथकाने एजंट श्री पवार यांना ताब्यात घेवुन पुढील कार्यवाही कामी लाप्रवि कार्यालयास आणले. सदर सापळा कारवाई दरम्यान व्हाईस रेकॉर्डर मधील झालेले संभाषण ऐकले त्यामध्ये आरोपी हे तक्रारदार यांनी लाच रक्कम दिल्या नंतर " ये कितना है ? अशी **विचारणा केली तक्रारदार याने पचास है असे सांगीतले तेव्हां आरोपी यांनी " आपका जो भी है आपको सभालुंगा असे आश्वासन दिले** " त्यांनतर माझे सांगणेप्रमाणे व घडलेल्या घटनेप्रमाणे माझी फिर्याद तयार करण्यात आली असुन ती वरील प्रमाणे आहे.

तरी दि.08/05/2025 रोजी गजानन मंदिरा जवळील रामभरोसे हॉटेल मध्ये संभाजीनगर ते वैजाई या मार्गावर माझ्या ट्रान्स्पोर्ट च्या वतीने चालणा-या दहा ट्रक ट्रेलरवर ओव्हरलोड कारवाई न करता सुरळीत वाहतुक होण्यासाठी छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक परिवहन विभागाचे मोटार वाहन निरीक्षक यांचे वतीने आश्वासीत करुन आरटीओ एजंट श्री दिपक साहेबराव पवार यांनी स्वत: करीता व मोटारवाहन निरीक्षक यांचे करीता 50,000 रु. (पन्नास हजार रुपये)ची लाचमागणी करुन दिनांक 09/05/2025 रोजी 15.41 वा.जीएम प्लाझा हॉटेल,आरटीओ कार्यालयाचे बाजुस,स्टेशन रोड छ.संभाजीनगर या ठिकाणी पंचा समक्ष 50,000 रु.(पन्नास हजार रुपये) लाचेची रक्कम स्वत: स्विकारली आहे.सबब माझी आरटीओ एजंट श्री दिपक साहेबराव पवार यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील प्रमाणे फिर्याद संगणकावर मराठी भाषेत टंकलिखीत केली असुन ती मला माझा मित्र प्रशांत जाधव यांने मराठीत वाचुन व हिंदीतुन समजावुन सांगीतली असता माझे सांगणे प्रमाणे ती बरोबर आहे.

समक्ष

ही फिर्याद दिली

(स्वाक्षरी)

दिनांक **10/05/2025**

नोंद क्र- **03** वेळ-**01.15** वा

गुरन -**95/2025** कलम **7(a),8** भष्ट्राचार प्रतिबंधक अधिनियम **1988** प्रमाणे मा. पोनि मा. यांच्या आदेशाने डि.ओ. मपोउपनि/ गिरी यांनी दाखल करुन पुढील तपास कामी पोलीस उप अधिक्षक श्री दिलीप साबळे ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे देण्यात आला आहे.

(स्वाक्षरी)
**ड्युटी ऑफीसर**
**पो.स्टे.वेदांतनगर**
**छत्रपती संभाजीनगर (शहर)**